सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# जिल्हा उद्योग केन्द्र

## नागपूर

NAGPUR

उद्योग संचालनालय

## उद्योग विभागाच्या योजना

- स्वयंरोजगार योजना
- उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम
- सामुहिक प्रोत्साहन योजना
- जिल्हा पुरस्कार योजना
- उद्योग आधार नोंदणी


उद्योग भवन, २रा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर

फोन : ०७१२ – २५६५९७४, २५६४८४२

ई–मेल : didic.nagpur@maharashtra.gov.in

वेबसाईट : www.di.maharashtra.gov.in





### २) बिज भांडवल योजना

* सुशिक्षित बेरोजगार युवकांना उद्योग व सेवा व्यापार उपक्रमात रोजगार उपलब्ध करून देणारी शासनाची योजना.
* ही योजना संपूर्ण राज्यात जिल्हा उद्योग केंद्र व बँकामार्फत राबविली जाते.
* सुशिक्षित बेरोजगारांना मार्जीन उभे करण्याकरीता बिज भांडवल उपलब्ध करून देण्यात येते.

पात्रता : अ) अर्जदार ७ वा वर्ग पास असावा ब) वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असावे क) उमेदवार बेरोजगार असावा. उमेदवार नोकरीत असल्यास बीजभांडवल वाटपा आधी नौकरी सोडावी लागेल. ड) उमेदवाराचे महाराष्ट्रातील कमीतकमी १५ वर्षे वास्तव्य असावे.

**योजनेची वैशिष्टये :**

* उद्योग, सेवा व व्यापार ह्या व्यवसायातील प्रकल्प मर्यादा रू. २५ लाखापर्यंत.
* १० लाखावरील प्रकल्पास बँकेनी मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या १५% प्रमाणे अथवा जास्तीत जास्त ३.७५ लाख एवढे भिजभांडवल रक्कम देण्यात येते.
* १० लाखापेक्षा कमी प्रकल्पास खालील प्रमाणे बिजभांडवल देण्यात येतृ
  १) सर्व साधारण प्रवर्गाकरीता १५ टक्के
  २) अनुसुचित जाती/जमाती, अपंग, विमुक्त व भटक्या जाती/जमाती आणि इतर मागास वर्गाकरीता २०%.
* बिज भांडवलाची रक्कम मृदु कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल ६ टक्के व्याजाने देण्यात येते.
* बिज भांडवलाची कर्जाची परतफेड विहीत कालावधीत करण्यात आली नाही तर थकीत रकमेवर दरसाल १% दंडनिय व्याज आकारण्यात येते.
* बिज भांडवली कर्जाची परतफेड नियमीत विहीत कालावधीत केल्यात ३% सवलत देण्यात येते.
* बिज भांडवली कर्जाची परतफेड ७ वर्षात करण्यात येते त्यामध्ये ३ वर्षाचा विलंबावधी समाविष्ट आहे. (वाहतुक व्यवसायासाठी व व्यापार व सेवा उद्योगासाठी विलंबावधी सहा महिन्याचा राहील.)